म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय आलंवा.
दा. क्र. ११६५१

इ. सं. १९६५
दा. क्र. ११९८५

# मंगलमूर्ति

JRBK-0111951
JRBK-0111951

दा. क्र. ११८५१
ग्रं. सं. ठाणे


# मंगलमूर्ति

लेखक :

दामोदर विष्णु कुलकर्णी
कोल्हापूर

प्रकाशक :
[दा]मोदर विष्णु कुलकर्णी
कोल्हापूर.

मुद्रक :
ह. वा. गुजर
[गु]र्विद्या मुद्रणालय,
सदाशिव, पुणे २.

IRBK-0111951

एकमेव विक्रेते :
महाराष्ट्र ग्रंथ भाण्डार, कोल्हापूर

किंमत ८ आणे.

'महाराष्ट्र ग्रंथभाण्डार, कोल्हापूर' याची

# बाल--मित्र--माला

या बालवाङ्मयाचे वाचक लिहितां वाचतां येणारीं ९ ते १२ पर्यंतचीं मुलें मानलीं आहेत. कल्पनेच्या घोड्यावर बसून भरधांव घ ण्याची बालमनाची प्रवृत्ति असते. या प्रवृत्तीला उत्तेजन द्यावें, तिचे पुरवावेत म्हणून त्यांच्या हातीं अद्‌भुतरम्य गोष्टी द्याव्या असें कित्येक मत आहे, तर कित्येक शिक्षणशास्त्रज्ञ असें मानतात कीं मुलाच्या मन कळी उमलत असतांना या सृष्टींतला प्रत्येक पदार्थ, प्रत्येक घटना अ प्रत्येक दृश्य त्याला अद्‌भुतरम्यच वाटत असतें. ही अद्‌भुतरम्यता जग होत असलेल्या त्याच्या परिचयाच्या नाविन्यामुळें उत्पन्न होत अ नाविन्याची, ताजेपणाची ही बालमनाची अवस्था आपण शेवट टिकवून धरीत नाहीं असा साधारणतः अनुभव येतो. नाहींपेक्षां मु प्रमाणेंच ही सृष्टि आम्हांलाहि क्षणोक्षणीं अद्‌भुतरम्यच वाटत राहि असती. मुलांची ही वृत्ति म्हणजे त्यांच्या बुद्धीची सृष्टीशीं भेट क देणारें वाहनच आहे असें म्हणतां येईल. ज्या ज्या पदार्थांकडे आकर्षित होतें त्याला पचवून पूर्णपणें आत्मसात् करण्याची त्या बुद्धीचीहि धडपड चालू असते; म्हणून परिणामीं बुद्धीला न पटत अशा अनैसर्गिक गोष्टी त्याच्यापुढें ठेवणें हें त्याच्या सर्वांगीण विकासा अनुकूल होत नाहीं.

ही विचारसरणी पुढें ठेवूनच 'बालमित्रमाले'चीं सर्व पुस्तकें निघतील आज प्रथम या मालेंतून 'आमचे सण' आम्हीं मुलांना वाचावया देणार आहोंत. मजेमजेनें मुलाच्या साध्या, सोप्या भाषेंत गोष्ट सांग सांगतां आमच्या सणांचें, उत्सवांचें आणि व्रतांचें ज्ञान मुलां अगदीं अभिनव पद्धतीनें करून देऊन त्या सणादिकांचा आजच्या शास्त्री युगांत आपण कसा उपयोग करून घ्यावा हें मुलांच्या मनावर सह बिंबविण्याचा उद्देश हीं पुस्तकें लिहून घेतांना पुढें ठेवला आहे. मन रंजन, सुसंस्कार व ज्ञान यांचा लाभ या पुस्तकांच्या वाचनानें मुलां व्हावा अशी अपेक्षा बाळगली आहे.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

# मंगलमूर्ति

'किती वर्गणी जमली रे, दिनकर ?' सुरेशनें विचारलें.

'आपल्या वर्गांतील फक्त पांचसहा मुलांची वर्गणी यायची आहे. बाकी सर्व मुलांनीं दिली आहे.'

'मग आतां, यायची राहिली आहे कोणाची ?'

'सिराज मुजावर, मायकेल बेकर, दोराब बाटलीवाला, सुरजासिंग, आणि एक दोघे आहेत.' दिनकरनें पावतीपुस्तक पहात सांगितलें.

'यांची वर्गणी मिळायची आशाच करायला नको. एक मुसलमान, दुसरा ख्रिश्चन तर तिसरा पारशी !' एक मुलगा म्हणाला.

'पण इथं जातीचा व धर्माचा काय संबंध आहे ? आपण सर्वजण विद्यार्थी आहोंत; म्हणून गणपतीचा उत्सव करणार आहोंत.' दिनकरनें सांगितलें.

'सिराज, तुला वर्गणी द्यायची नाहीं का ?' सुरेशनें विचारलें.

'तुम्ही जर गॅदरिंग करीत असाल तर त्याला मी पांच रुपये-सुद्धां वर्गणी द्यायला तयार आहें.' सिराजनें उत्तर दिलें.

'मीं दहा रुपये देईन.' मायकेल म्हणाला.

'गॅदरिंगसाठीं आम्ही वाटेल तितके पैसे खर्च करायला तयार आहोंत. पण हत्तीची सोंड असलेल्या ह्या तुमच्या देवाच्या उत्सवाला एक दिडकीसुद्धां देणार नाहीं.' सिराज जोरानें म्हणाला.

‘ सिराज, बरोबर आहे तुझं म्हणणं. कायरे दिनकर, हा कसला रे तुमचा देव ? सगळं अंग माणसाचं आणि तोंड हत्तीचं ! काय देव आहे का सोंग आहे ? ’ मायकेल धाकावर हात आपटीत म्हणाला.

‘ हें पहा, सुरेश, आम्हाला मूर्तिपूजा मान्य नाहीं. तुमच्या धर्माला मूर्तिपूजा मान्य आहे तर तुम्ही खुशाल करा. आमच्याकडं कशाला वर्गणी मागतां ? ’ सिराज म्हणाला.

‘ दिनकर, तुम्ही आम्हाला कां कटकट करता वर्गणीची ? आम्ही या तुमच्या गणेश–उत्सवांत मुळींच भाग घेणार नाहीं.’ मायकेल म्हणाला.

‘ अरे जा, तुम्ही भाग घेतला नाहींत म्हणून आमचा उत्सव राहतोय काय ? ’ एक मुलगा तावातावानें बोलला.

‘ अरे, असे भांडताय कशाला ? सुरेश, मी तुला विचारतों, तोंड हत्तीचं अन् अंग माणसाचं, असला कसला देव तुमचा ? अशीं जनावरांचीं तोंडं असलेले कधीं देव असतात काय ? ’ दोराब गंभीरपणानें म्हणाला.

‘ हें पहा, दोराब, त्यांचा देव कसला का असेना ? आपल्याला त्याच्याशीं कांहींच करायचं नाहीं. फक्त वर्गणी द्यायची कीं नाहीं एवढाच आपला प्रश्न आहे. आपण उगाच दुसऱ्यांच्या देवाची व धर्माची चेष्टा करणं बरं नव्हे. ’ सिराज शांतपणें म्हणाला.

‘ तुम्ही माझं जरा ऐकाल का ? हें पहा, आम्ही हा हिंदूच्या देवाचा उत्सव करीत नाहीं.’ सुरेश म्हणाला.

‘ मग काय, हा आमचा देव आहे ? ’ मायकेल जोरानें म्हणाला.

'हा देव तुमचाहि नाहीं व माझाहि नाहीं. तो आपणा सर्वांचा देव आहे. देव हा एकच आहे. गणपती हा सर्व जातींच्या व धर्मांच्या विद्यार्थ्यांचा देव आहे.' दिनकरनें सांगितलें.

'हा विद्यार्थ्यांचा देव आहे ? कसा तो सांग पाहूं.' मायकेलनें विचारलें.

'गणपती हा मोठा विद्वान् व थोर पुरुष होऊन गेला. यानं आपल्या देशांत शिक्षणाचा प्रसार केला. यानं लेखनकलेचा प्रारंभ केला. उत्तम लिपी शोधून काढली. हा विद्या देणारा आहे. याची जर मनोभावानं पूजा केली तर विद्या प्राप्त होते.' दिनकरनें सांगितलें.

'असल्या ढेरपोट्या व लांबसोंड्या देवाची पूजा करून विद्या मिळाली तर अभ्यास करायचं कारण नाहीं.' सुरजसिंगानें म्हटलें.

याप्रमाणें त्या वर्गांतील विद्यार्थ्यांचा वाद अगदीं ऐन रंगांत आला होता. तास सुरु होण्याची घंटाहि होऊन गेली; पण त्यांचे गुरुजी वर्गांत येऊन खुर्चीवर बसेपर्यंत त्यांना दादहि लागली नाहीं.

'काय रे, कसला वाद चालला आहे एवढा ?' गुरुजींनीं विचारलें.

'गणपती–उत्सवाबद्दल.' दिनकरनें सांगितलें.

'मग त्याबद्दल वाद घालीत बसायचं काय कारण ?' गुरुजी म्हणाले.

'गुरुजी, हा सिराज, मायकेल, दोराब वगैरे पांच सातजण उत्सवाला वर्गणी देत नाहीं म्हणतात.' सुरेशनें खुलासा केला.

'काय सिराज, वर्गणी द्यायची तुमची इच्छा नाहीं कीं, तुमचे पालक नको म्हणतात ?' गुरुजींनीं विचारलें.

'तर, तर! पालक नको म्हणतात. सिनेमाला जातांना पालकांना कोण विचारत नाहींत तें?' एक मुलगा मध्येंच उठून म्हणाला.

'हें पहा, मध्येंच उठून कोणी फाजील बडबड करायची नाहीं हं.' गुरुजींनीं त्या विद्यार्थ्याला दटावीत पण सर्व वर्गाला उद्देशून म्हटलें.

'गुरुजी, असं जनावरचं तोंड असलेल्या देवाचा उत्सव करणं आम्हांला पसंत नाहीं. शिवाय मूर्तिपूजा मला मान्य नाहीं.' सिराजनें सांगितलें.

'हें बघ, सिराज, गणपती खरोखरच हत्तीची सोंड असलेला होता कीं नाहीं तें आपण नंतर पाहूं; पण अगोदर तूं माझ्या प्रश्नाचं उत्तर दे. तुला व तुझ्या धर्माला मूर्तिपूजा मान्य नसली तरी तुम्ही दर शुक्रवारीं अगदीं न चुकतां मशिदींत जाऊन नमाज पढतां कीं नाहीं?'

'आम्हीं अगदीं नियमानं नमाज पढतों, गुरुजी.' सिराज म्हणाला.

'रमजान ईद, बकरी ईद, यांसारखे सण व मोहरम तुम्ही साजरे करतां कीं नाहीं?'

'करतों, गुरुजी.'

'बरं, सिराज, तूं बैस आतां. मायकेल, सांग पाहूं, तूं दर रविवारीं चर्चमध्यें जाऊन भगवान ईसाची–येशू ख्रिस्ताची–प्रार्थना करतोस कीं नाहीं?'

'करतों, गुरुजी.'

'मायकेलच्या धर्मांत भगवान् येशूच्या फोटोची व क्रूसाची पूजा करतात. नाताळ व ईस्टर हे सण ते मोठ्या उत्साहानं व थाटा-

माटानं साजरे करतात. नवरोज वगैरे सण दोराब मोठ्या उत्साहानं करतो. सर्व धर्मांत सण व उत्सव आहेत. फक्त त्यांचं स्वरूप थोडं फार वेगळं आहे, इतकंच.' गुरुजींनीं सांगितलें.

'गुरुजी, हा उत्सव शाळेंत सर्वांनीं करण्याइतकं ह्याचं काय महत्त्व आहे तें आम्हाला समजावून सांगा. मग तें आम्हाला पटलं तर आम्हीं या उत्सवांत अगदीं आनंदानं भाग घेऊं.' सिराज म्हणाला.

'जरूर.' गुरुजी म्हणाले.

'गुरुजी, आज अभ्यास घेणार नाहीं?' एका विद्यार्थ्यानें विचारलें.

'अहो स्कॉलर, बसा खालीं. काय पण अभ्यासाची काळजी लागलीय् पहा.' दुसऱ्या विद्यार्थ्यानें त्या विद्यार्थ्यास टोमणा मारला.

'हें पहा, मी तुम्हाला गणपतीची गोष्ट सांगतों.'

'वा! फारच छान, गुरुजी.' असें म्हणत सर्व विद्यार्थ्यांनीं टाळ्या वाजविल्या व बाकावर जोरजोरानें हात आपटले.

'हें काय? असा गोंगाट नाहीं करायचा. गोष्ट ऐकायला मिळणार म्हणून झालेला आनंद असा शेजारच्या वर्गाला त्रास देऊन प्रगट करायचा नाहीं.' शिक्षकांनीं मुलांना सूचना दिली.

'आतां आम्ही अगदीं गोंगाट करीत नाहीं.' मुलें म्हणालीं.

गुरुजींनीं गोष्ट सांगायला सुरुवात केली. ते गोष्ट सांगूं लागले.

'फार फार वर्षे झालीं. सुमारें चार पांच हजार वर्षे झालीं. त्या वेळीं आपल्या देशांत ब्रम्हदेव या नांवाचा राज राज्य करीत होता. हा राजा फार दयाळू न्यायी होता. तो आपल्या प्रजेचें

पोटच्या मुलाप्रमाणें पालन करीत होता. त्याची प्रजा अत्यंत सुखी होती. सर्व देश धनधान्यानें भरलेला होता.

एकदां ब्रम्हदेव आपल्या एका मित्राला भेटण्यासाठीं त्याच्या राजधानीला चालले होते. त्यांच्याबरोबर त्यांचा प्रधान व इतर लोक होते. वाटेंत त्यांचा मुक्काम एका सरोवराचे कांठीं पडला.

तें सरोवर अत्यंत सुंदर होतें. त्यांत कमळें फुललीं होतीं. राजहंसपक्षी कमळांतील मध खात होते. सूर्यकिरण त्या सरो-वरावर पडल्यामुळें तें अधिकच सुंदर दिसत होतें.

त्या सरोवरावर कांहीं मुलीहि आल्या होत्या. कांहीं स्नान करीत होत्या. कांहीं पोहत होत्या. कोणी कमळें काढीत होत्या तर कोणी राजहंसपक्षी पकडण्याचा प्रयत्न करीत होत्या.

त्या मुलींत एक मुलगी फारच सुंदर होती. ती रंगानें गोरी नव्हती. काळी सावळीच होती. पण तिचा लांबट चेहरा, सरळ नाक, पाणीदार डोळे व बांधेसूद शरीर ती सुंदर असल्याची साक्ष देत होते.

त्या मुलीला पहातांच ब्रम्हदेव तिच्यावर मोहित झाले. त्यांना तिच्याशीं लग्न करावें असें वाटूं लागलें. त्यांनीं आपल्या प्रधानास बोलावून त्या मुलीची चौकशी करण्यास सांगितलें.

प्रधान काय, हुकुमाचा ताबेदार! त्यानें जाऊन त्या मुलीची सर्व चौकशी केली व ब्रम्हदेवाला येऊन सांगितलें, ‘ महाराज, त्या मुलीचें नांव महाजृंभा आहे. मी तिला आपली सर्व माहिती सांगितली. ती आपल्याशीं विवाह करायला तयार आहे. पण महाराज, ती राक्षस—कन्या आहे ! ’

‘ गुरुजी, राक्षसांच्या मुलीशीं माणसाचं हो कसं लग्न होणार ? ’ एका मुलानें विचारलें.

' राक्षस म्हणजे पुष्कळ तोंड असलेले. अक्राळ विक्राळ जबड्याचे, भयंकर फारोळ्या दांताचे व फार भयंकर प्राणी, अशी तुझी समजूत आहेना ? '

' होय, गुरुजी. राक्षस म्हटला कीं अजून आम्हाला भीति वाटते.' दुसऱ्या एका मुलानें सांगितलें.

' त्या तुमच्या समजुती चूक आहेत. राक्षसदेखील माणसंच होतीं. त्यांतील कांहीं लोक क्रूर, जंगली व माणसाचंच मांस खात होते. म्हणून त्यांच्याबद्दल आपणास भीति वाटूं लागली.'

' गुरुजी, माणसाचं मांस खाणारे कांहीं लोक सध्यादेखील आफ्रिका खंडांत व इतर कांहीं देशांत आढळतात ना ? ' सिराजनें विचारलें.

' होय, अशा माणसांच्या कांहीं जाती अद्यापिहि आढळतात. त्यांनाहि राक्षसच म्हणतां येईल. पण पूर्वी ह्या राक्षसांपैकीं कांहीं लोक फारच सुधारले होते. ते चांगले शिकलेले होते. त्यांनीं शहरें वसविलीं होतीं. व्यापार वाढविला होता. राज्यें स्थापन केलीं होतीं. अशाच एका राक्षसाच्या राजाची महाजृंभा ही मुलगी होती.

ब्रम्हदेव आर्य होते. राक्षस अनार्य होते. आर्य व अनार्य राक्षस ह्यांचीं नेहमीं युद्धें सुरू असत. महाजृंभेशीं विवाह करून आर्य व राक्षस यांचा एकोपा घडवून आणावा असें ब्रम्हदेवांना वाटलें व पुढें लवकरच त्यांनीं महाजृंभेशीं मोठ्या थाटानें विवाह केला.

महाजृंभा महा वस्ताद होती. तिनें ब्रम्हदेवावर आपली चांगलीच छाप बसविली. ब्रम्हदेव तिच्या अर्ध्या वचनांत राहूं

लागले. ते तिच्या शब्दाबाहेर एक अक्षरहि जात नसत. लवकरच महाजृंभा पट्टराणी झाली. ती सर्वांवर अधिकार गाजवूं लागली.

हळुहळूं तिनें आपल्या माहेरचे लोक आणण्यास सुरवात केली. त्या लोकांना मोठ्या मानाच्या व अधिकाराच्या जागा दिल्या. ब्रम्हदेव फक्त नामधारी राजा राहिला. सर्व राज्यकारभार महाजृंभेच्या तंत्रानें चालूं लागला. तिनें जुन्या प्रधानमंडळाला रजा दिली व आपल्या आप्तेष्टांचें प्रधानमंडळ बनविलें.

महाजृंभेच्या माहेराहून आलेले लोक परक्या देशांतील होते. त्यांना या देशांतील लोकांच्या कल्याणाची काय काळजी वाटणार ? ते स्वतःची चैन चालविण्यासाठीं प्रजेवर जुलूम करूं लागले. त्यांना ब्रम्हदेवाच्या प्रजेच्या कल्याणाची थोडीच काळजी वाटणार ?

कांहीं दिवसांनंतर महाजृंभेला एक मुलगा झाला. मुलगा फार सुंदर होता. त्याचा रंग तांबूस होता. मुलगा पाहून ब्रम्हदेवास फार आनंद झाला. त्या मुलाचें नाव सिंदुरासुर असें ठेवण्यांत आलें.

सिंदुरासुर अंगापिंडानें चांगला मजबूत होता. महाजृंभेनें त्याला सर्वप्रकारचें उत्तम शिक्षण दिलें. लवकरच तो युद्धकलेंत व राज्यकारभाराच्या ज्ञानांत तरबेज झाला.

सिंदुरासुराला राक्षसांच्या विषयीं जास्त आपलेपणा वाटत असे. त्याला आपल्या आजोळच्या माणसांविषयीं अधिक ओढा वाटत असे. सर्व आर्यांचा नाश करून राक्षसांचें साम्राज्य स्थापन करावें असे विचार त्याच्या मनात सारखे येऊं लागले.

या विचारांना अधिक चालना द्यायला राक्षसपरिवार त्याच्या सभोंवतीं होताच.

सिंदुरासुर सोळा वर्षांचा झाला. तेव्हां त्याला स्वत: राजा होण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यानें आपल्या गरीब व सज्जन बापाला तुरुंगांत टाकून आपण राज्य बळकावलें. त्याला आड-काठी तरी कोण करणार ? कारण सर्व अधिकारी त्याच्याच आजोळचे होते.

सिंदुरासुर जात्या हुषार होता. त्यानें आपल्या राज्याची व्यवस्था लावून अधिक प्रदेश मिळविण्याचा उद्योग आरंभिला. सर्वत्र राक्षस साम्राज्य स्थापन करून आपण सम्राट होण्याची सिंदुरासुरानें महत्वाकांक्षा बाळगली.

त्या वेळीं आपल्या देशांत पुष्कळ लहान लहान राज्यें होतीं. तेथिल राजांचें आपआपसांत वाकडें होतें. त्यांच्यांत नेहमीं लढाया चालत. कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नव्हता. प्रत्येकजण आपला स्वार्थ साधण्यासाठीं धडपडत होता. देशाची काळजी कोणालाहि नव्हती.

सिंदुरासुरानें या परिस्थितीचा फायदा घेण्याचें ठरविलें. त्यानें राजे लोकांत अधिकच भांडणें लावून दिलीं आणि त्याचा फायदा आपण करून घेतला. त्यानें कोणास धाक दाखवून तर कोणास मदत करून प्रदेश मिळविले. कांहीं राजांशीं युद्धें करून त्यानें त्यांना आपल्या ताब्यांत आणलें. कांहीं राजांना लालूच दाखवून तर कांहींचें मन वळवून सिंदुरासुरानें त्यांना आपले मांडलिक बनविलें. ज्यांनीं त्याला अडथळा केला त्यांना त्यानें ठार मारलें. कित्येकांना त्यानें कैदेंत टाकलें.

याप्रमाणें लवकरच सर्व देशांत त्यानें आपलें सार्वभौम राज्य स्थापन केलें.

सिंदुरासुरानें अमरावतीवर स्वारी केली आणि देवांचा राजा जो इंद्र, त्याला कैद करून आपल्या बंदिशाळेंत टाकलें.

ब्रम्हदेवाच्या पूर्वींच्या मंत्रिमंडळानें सिंदुरासुराचा नाश करण्याचा प्रयत्न केला. पण त्याचा तो कट शेवटास जाण्यापूर्वींच एका घरभेद्यानें तो कट फोडला. मग काय विचारता ?

सिंदुरासुर वाघासारखा चवताळून गेला. त्यानें पूर्वींच्या सर्व मंत्र्यांची सरसकट कत्तल केली. केवळ संशयावरून अनेक निरपराध लोकाना ठार मारण्यात आलें.

सिंदुरासुराला आर्य लोकांच्या विषयीं भयंकर संशय वाटूं लागला. त्यानें सर्व आर्य लोकांना कामावरून कमी केलें आणि त्या ठिकाणीं राक्षस अधिकारी नेमले. त्यानें आपल्या सैन्यांतून आर्य लोकांची हकालपट्टी केली व त्या जागीं राक्षसांचा भरणा केला.

सर्व लोक राक्षसांच्या जुलुमांनीं व अत्याचारांनीं अगदीं त्रासून गेले होते. देशांतील विद्वान लोक सिंदुरासुरास व त्याच्या परकीय राक्षस नातेवाईकांस हाकलून लावण्याच्या प्रयत्नांत होते.

त्या काळीं देशांतलि विद्वान् लोकांना ऋषिमुनी म्हणत असत. सारी जनता राक्षसांच्या जुलुमानें घाबरून गेली होती.

सर्व लोक अगदीं हवालदिल झाले होते. त्यांना कांहीं मार्ग दिसत नव्हता. स्वधर्म व स्वदेश यांच्याविषयीं त्यांच्या मनांत अनास्था उत्पन्न होऊं लागली. ज्ञानभांडारें बंद पडलीं होतीं. लोक अज्ञानांत खितपूं लागले.

विद्वान् लोकांनीं मंदिरातून कथा, कीर्तन व पुराण सुरू केलें. ह्या मार्गांनीं लोकजागृतीचें कार्य सुरू झालें. कांहीं दिवसांनीं ही गोष्ट सिंदुरासुरास कळली. लगेच त्यानें देव–मंदिरांत चालणाऱ्या धार्मिक गोष्टींना बंदी केली. देवळांतून चालणारीं कथाकीर्तनें व पुराणें बंद करण्यांत आलीं.

कथाकीर्तनांतून प्रचार करणाऱ्या पुढाऱ्यांना देहांत शिक्षा दिल्या. कांहींना अंधार कोठड्यांतून डांबून टाकलें. आपल्या विरुद्ध कसलेंहि कारस्थान होऊं नये म्हणून सिंदुरासुर डोळ्यांत तेल घालून जपत असे.

एके दिवशीं सिंदुरासुराचे दरबारांत एक ज्योतिषी आला. त्यानें सिंदुरासुराचा हात पाहिला. त्याची जन्मकुंडली मांडली व मग सिंदुरासुराला त्याचें भविष्य सांगितलें. 'राजा, या देशांत पुढील महिन्यांत एका राजाला मुलगा होईल त्या मुलाचे हातून तुला मरण येईल. पण तुला निदान सोळा वर्षें तरी घाबरण्याचें कारण नाहीं. कारण तो राजपुत्र सोळा वर्षांचा होईतोंपर्यंत तुझ्या वाटेस जाणार नाहीं!'

'आपण मला संकटाची सूचना दिली त्याबद्दल मी आपला ऋणी आहें. पण कोणत्या देशाच्या राजपुत्रापासून मला मरण येणार आहे तें कृपा करून सांगा.' सिंदुरासुर हात जोडून म्हणाला.

'राजा, ती गोष्ट माझ्या शक्तीबाहेरची आहे. तें जाणण्याचें ज्ञान मला नाहीं. फक्त मला जो धोका दिसला त्याची मी तुला सूचना दिली. आतां तुला जी काळजी घेतां येईल ती तूं घे.'

इतकें सांगून तो ज्योतिषी भरपूर दक्षिणा घेऊन निघून गेला. पण इकडे सिंदुरासुर अगदीं घाबरून गेला. त्यानें सर्व

मांडलिक राजांकडे आपले हेर पाठवून बातमी काढण्याचें काम सुरू केलें.

सिंदुरासुराचे गुप्तहेर निरनिराळ्या राजांच्या दरबारांत जाऊन गुप्तपणें राहिले. भाद्रपद महिना उजाडला. या महिन्यांत जन्मणाऱ्या राजपुत्रांच्याविषयीं पूर्ण माहिती मिळविण्याचे हेरांना हुकूम सुटले.

सुमारें पंधरा एक राजपुत्र या महिन्यांत जन्माला आले. सिंदुरासुरानं त्या कोंवळ्या बालकांना आपल्याकडे पाठवून देण्यास आपल्या मांडलिक राजांना हुकूम सोडले. सम्राटाचा हुकूम तो! तो मोडण्याची धमक एकाहि राजाच्या अंगांत नव्हती.

तें सुंदर चिमुकले राजबालक सिंदुरासुराचे दरबारीं आणण्यांत आलें. मग संशयानें पछाडलेल्या त्या दुष्ट सिंदुरासुरानें त्या सुकुमार राजपुत्रांची निर्दयपणें कत्तल केली.

या वेळीं कैलास नगरींत आनंदी आनंद झाला. महाराणी पार्वतीला मुलगा झाला होता. सर्व नागरिकांना अतिशय आनंद झाला होता. सर्व नगरभर गुढ्या तोरणें उभारण्यांत आलीं. हळदीकुंकवाचे सडे घालण्यांत आले. घरोघरीं साखर वाटण्यांत आली.

कैलास नगरीचे राजे शंकर ह्यांना मुलगा पाहून फार आनंद वाटला. मुलगा फारच सुंदर होता. तांबूस गोरा वर्ण, लांब व सरळ नाक, पाणीदार डोळे, लांबट चेहरा यामुळें हा बालक फारच सुंदर दिसत होता.

‘ गुरुजी, जरा थांबा. मला एक शंका विचारायची आहे. ’ मायकेल उठून म्हणाला.

'काय आहे. विचारना ?' गुरुजी म्हणाले.

'गुरुजी, हे शंकरपार्वती कोण, कुठले, तें नाहीं सांगितलंत ?' मायकेल म्हणाला.

'हो, सांगतों हं. हिमालयाच्या उतरणीवरील प्रदेशांत शंकर या नांवाचा एक पराक्रमी राजा राज्य करीत होता. हल्लीं नेपाळ, भूतान हीं संस्थानें आहेत ना ? तोच प्रदेश पूर्वीं शंकराचे राज्यांत येत होता.

कैलास नांवाची सुंदर नगरी शंकराची राजधानी होती. शंकराचे राज्यांतील प्रजा सुखी व स्वतंत्र होती. तो प्रदेश डोंगराळ, जंगलाचा व जिंकण्यास कठीण असल्यामुळें सिंदुरासुराचे तडाक्यांतून बचावला होता.

शंकराच्या बायकोचें नांव पार्वती होतें. ती फार सुंदर व हुशार होती. तिला राज्यकारभाराचें चांगलें ज्ञान होतें. शंकरांनीं जवळ जवळ सगळा राज्यकारभार तिच्या स्वाधीन केला होता. शंकर स्वतः आपला बहुतेक वेळ ईश्वराची आराधना करण्यांत घालवीत असत.'

'गुरुजी, शंकराला भूत, पिशाच्च यांचा राजा कां म्हणतात ?' सुरेशनें विचारलें.

'शंकराच्या राज्यांत भूत, पिशाच्च या जातींचीं माणसें राहात होतीं. त्या प्रदेशाला पूर्वीं भूतस्थान म्हणजे भूत लोकांच्या राहण्याचें ठिकाण म्हणत. पुढें भूतस्थानचें भूतान झालें. हल्लींदेखील भूतान संस्थानांतील लोकांना भूतच म्हणतात. भूत, पिशाच्च या जातींचीं माणसें होतीं. जसे भिल्ल, कातकरी वगैरे आहेत तशींच. भूत म्हणजे माणसाचे मागें लागणारा समंध नव्हे.'

'गुरुजी, तास संपेल. लवकर गोष्ट सांगा पाहूं.' एक मुलगा म्हणाला.

'बरं. पुढं ऐका.' म्हणून गुरुजी गोष्ट सांगूं लागले.

'शंकरानें मोठ्या थाटामाटानें मुलाचें बारसें केलें व त्या सुंदर बालकाचें नांव गणेश ठेवण्यांत आलें. गणेशाचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीला झाला. दिवसें दिवस गणेश मोठा होऊं लागला. तो गुटगुटीत व गोंडस मुलगा पाहून शंकरपार्वतीला मोठा आनंद वाटत असे.

एक दिवस शंकर–पार्वती सोंगट्यांनीं खेळत बसले होते. छोटा गणेश मांडलेल्या सोंगट्या गोळा करून तोंडांत घालीत होता. इतक्यांत शंकराचा प्रमुख सरदार वीरभद्र तेथें आला.

'वीरभद्र, आतां कां येणं केलं?'

'महाराज, फार महत्त्वाची सूचना द्यायला आलों आहें.'

'कांहीं कमीजास्त प्रकार आहे काय? सिंदुरासुराची स्वारी तर आपल्या राज्यावर होत नाहींना?'

'महाराज, स्वारी झाली असती तर मला मुळींच भीति वाटली नसती. पण शत्रू कपटाचे डाव खेळूं लागला आहे.'

'म्हणजे काय? मला नाहीं याचा अर्थ कळला.'

'सिंदुरासुराला छोटे कुमार श्रीगणेश पाहिजे आहेत. त्या कोणीतरी मूर्ख ज्योतिषानं सांगितलं आहे कीं, भाद्रपद महिन्यांत जन्मलेल्या राजपुत्राचे हातून तुला मृत्यु येणार आहे. म्हणून त्यानं एका वर्षाचे आंतील बहुतेक राजपुत्रांना सरसकट ठार मारण्याचा सपाटा चालविला आहे. तेव्हां राजकुमाराला राजधानींत ठेवणं धोक्याचं आहे. कारण त्याचे दुष्ट राक्षस निरनिराळ्या रूपानं आपल्या राजधानींत वावरूं लागले आहेत.'

‘ अगबाई ! माझ्या बाळाला कुठं तरी दूर सुरक्षित ठिकाणीं नेऊन ठेवला पाहिजे.’ पार्वती काळजीच्या स्वरानें गणेशाला जवळ उचलून घेत म्हणाली.

‘ आपण बाळाला राजा वरेण्याकडे माहिष्मतीला पाठवूं या. तो आपल्या पोरापेक्षां आमच्या बाळाची जास्त काळजी घेईल.’

‘ तसंच करावं. ’ पार्वतीनें सांगितलें.

‘ वीरभद्र, आतां विलंब लावूं नका. राजकुमाराला अगदीं गुप्तपणें माहिष्मती नगरीला पोचता करा. ’ शंकरानें वीरभद्रास आज्ञा केली.

‘ ठीक आहे, महाराज, आपल्या आज्ञेप्रमाणं सर्व व्यवस्था करतों.’ इतकें सांगून वीरभद्र निघून गेला.

लवकरच बालक श्रीगणेश याच्या जाण्याची तयारी करण्यांत आली. आपल्या बाळाला दूर पाठवितांना पार्वतीला भयंकर वाईट वाटलें. पण पुढील परिणामाकडे लक्ष देऊन तिनें आपलें दुःख आवरलें.

राजा वरेण्यानें आपल्या मित्राच्या मुलास अगदीं आनंदानें ठेवून घेतलें. पण राणी पुष्पावतीला ही गोष्ट कळतांच, तिनें गणेशास आपल्या येथें ठेवून घेण्याचें नाकारलें. कारण तिचा मुलगा राक्षसांनींच पळवला असावा अशी खात्री झाली होती. दिवाणखान्यांत खेळत बसलेलें मूल अकस्मात् कुठें नाहींसें झालें त्याचा पत्ताच लागला नव्हता. खुंटीनें हार गिळल्यांतलाच प्रकार झाला होता.

राणी पुष्पावतीनें राजाची समजूत घातली व परक्याचें मूल ज्याचे त्याचे घरीं पोचाविण्याचें ठरविलें. तिनें अगदीं बंदो-वस्तानें श्रीगणेशास परत कैलास नगरीस पाठविलें.

राजा वरेण्याचे नोकर गणेशास घेऊन जात असतां त्याचा मुक्काम एका जंगलांत पडला. एक नोकर गणेशाला घेऊन बसला व बाकीचे जेवणाच्या तयारीला लागले होते.

इतक्यात वाघोबाची डरकाळी आली. नोकर वळून पाहतात, तों एक ढाण्या वाघ उड्या टाकीत त्यांच्यावर चालून येत होता. दोघे नोकर जीवाच्या भीतीनें पसार झाले. एकावर वाघानें हल्ला चढविला. गणेशास घेतलेला नोकर, गणेशाला खालीं ठेवून आपल्या मित्राच्या मदतीला धांवून गेला. पण तोहि बिचारा प्राणाला मुकला.

वाघ त्या गरीब नोकरावर ताव मारीत होता. छोटा बालक गणेश रडत पाल्यापाचोळ्यांतून रांगत होता. त्याला भूक लागली होती व भूकेनें तो एकसारखा रडत होता.

या वेळीं पराशर ऋषि यज्ञासाठीं समिधा गोळा करण्याकरता फिरत होते. त्यांच्या कानांवर मुलाच्या रडण्याचा आवाज गेला. त्याबरोबर ते आवाजाच्या रोखानें निघाले. जवळ जाऊन पाहातात तों एक सुंदर बालक पाल्यातून रांगत आहे. थोड्या अंतरावर एक वाघ ठार केलेल्या माणसावर ताव मारीत बसला आहे. हें दृश्य पाहतांच पराशरांनीं आपल्या धनुष्याला बाण लावला व एका बाणांत वाघाला ठार केलें.

नंतर त्यांनीं त्या बालकाला उचलून घेतलें व ते आपल्या आश्रमांत आले. त्यांनीं तो मुलगा आपल्या बायकोच्या हवालीं केला. तो सुंदर मुलगा पाहून पराशराच्या बायकोला फार आनंद झाला. तिनें त्या बालकाची चांगली काळजी घेण्यास सुरवात केली.

पराशराना तो मुलगा कोणाचा व कुठला याचा कांहींच

पत्ता लागेना. त्या बालकाचे गळ्यांत एक हस्तीदंती ताईत होता. त्या ताईतावर हत्तीचें तोंड सुंदर तऱ्हेनें कोरलें होतें. हत्तीचें तोंड कोरलेला तो ताईत पाहून पराशर त्या बालकाला 'गजानन ' म्हणून बोलवूं लागले.'

'दिनकर, गजानन म्हणजे काय सांग पाहूं ' गुरुजींनीं विचारलें.

'गजानन म्हणजे हत्तीचें तोंड.' दिनकरनें उठून सांगितलें.

'बरोबर आहे. या गजानन नांवानेंच पुढें घोटाळा निर्माण केला. गणेशाचें गजानन हें नांवच सर्वत्र रूढ झालें. गजानन राष्ट्रपुरुष बनला. घरोघरीं लोक त्याची भक्तिभावानें पूजा करूं लागले. कांहीं लोकांना वाटलें, गजानन म्हणजे हत्ती सारखें तोंड असलेला. मग काय, त्या अंध भक्तांनीं गजाननाचे मूर्तीला हत्तीचें तोंड चिकटवून टाकलें. आणि आज त्याच स्वरूपांत गजाननाची सर्व हिंदुस्थानभर पूजा चाललेली दिसते. पण मूळच्या गजाननाला मुळींच सोंड नव्हती. बरें असो.

दिवसें दिवस गजानन मोठा होत चालला. पराशर ऋषींच्या आश्रमांत ब्रम्हदेवाची पहिली बायको येऊन राहिली होती. सरस्वती तेथें तपस्विनीप्रमाणें राहात होती. ब्रम्हदेवानें महाजृंभेशीं लग्न केल्यानंतर सरस्वतीला फार त्रास होऊं लागला. महाजृंभा सवतीमत्सरानें तिचा छळ करूं लागली. तेव्हां ती राज्ञीपद सोडून अरण्यांत तपश्चर्येला निघून गेली. सरस्वती विद्येंत व कलेंत तरबेज होती. त्या काळीं गायनकलेंत तिचा हात धरणारी स्त्री दुसरी कोणीच नव्हती. सरस्वतीचें गायन व वीणावादन स्वर्गीय वाटत असे. सरस्वतीला बाल गजाननाचा फारच लळा लागला. ती गजाननाला गायन शिकवूं लागली.

पराशरांचा मुलगा व्यास व गजानन अगदीं सख्या भावा-प्रमाणें आश्रमांत राहात होते. पराशरांनीं दोघांना एकदम वेद शिकविले.

पराशर ऋषि फार प्रख्यात ज्योतिषी होते. त्यांनीं गजाननाचा हात पाहिला व चेहऱ्यावरून त्याची कुंडली मांडली. तेव्हां त्यांची खात्री झाली कीं गजानन हा मोठेपणीं फार मोठा पुरुष होईल. त्याच्या हातावरील सर्व चिन्हें चांगलीं होतीं. गजानना-च्या हस्तरेषेवरून पराशरांनीं भविष्य वर्तविलें कीं, हा मुलगा पराक्रमी, विद्वान् व थोर लोकसेवक होईल. त्यांनीं गजाननाला सर्व प्रकारचें शिक्षण देण्यास सुरुवात केली. त्यांनीं त्याला युद्ध-कलेचें उत्तम शिक्षण दिलें. लवकरच गजानन सर्व विद्येंत व कलेंत पारंगत झाला.

इकडे सिंदुरासुराचे अत्याचार एकसारखे वाढत चालले होते. यज्ञयाग बंद पडले. गुरुकुलें ओस पडलीं. वेदघोषांचे आवाज ऐकूं येईनासे झाले.

पराशरांना राक्षसाचेबद्दल अत्यंत चीड वाटत होती. कारण त्याच्या वडिलांना राक्षसांनीं ठार मारलें होतें. म्हणून ते राक्षसां-च्यावर सूड उगाविण्याच्या संधीची वाट पहात होते.

पराशरांनीं गजाननाला राक्षसांच्या व सिंदुरासुराच्या अत्या-चाराच्या गोष्टी सांगितल्या. त्याला आपल्या देशाचें पूर्व वैभव व सध्यांची परिस्थिति यांची पूर्ण माहिती करून दिली. देशाला पूर्व वैभव प्राप्त करून देण्याची महत्त्वाकांक्षा पराशरांनीं गजाननाचे मनांत उत्पन्न केली. दुष्ट राक्षसांचे गुलामगिरींतून आपल्या देशाची मुक्तता करण्याचे विचार गजाननाचे मनांत सारखे येऊं लागले. आतां गजानन चवदा पंधरा वर्षांचा झाला होता. त्याला

आपल्या देशाची व लोकांची स्थिति चांगली समजून आली. राक्षसांचे अत्याचार ऐकून त्याचें तरुण रक्त सळसळूं लागलें.

गुरु पराशर यांच्या आज्ञेनें गजाननानें गांवोगाव हिंडून मित्र गोळा करायला सुरुवात केली. नंतर ह्या सर्व तरुण मंडळींनीं लोकांची संघटना करण्यास सुरुवात केली. गजानन फार उत्तम वक्ता होता. त्याच्या भाषणाची लोकांच्या मनावर छाप पडत असे.

सिंदुरासुराच्या भीतीनें पुष्कळ आर्य लोक रानावनांतून व डोंगरांतील गुहांतून रहात होते. गजाननानें या लोकांच्यांत जाऊन चांगली जागृति केली.

गजाननानें नाग, भिल्ल, भूत, पिशाच्च वगैरे जातींतील तरुण गोळा केले. राक्षसांच्या जुलमी सत्तेविरुद्ध लढण्याविषयीं त्यांची मनें तयार केलीं. लवकरच या सर्व तरुणांचें एक मोठें सैन्य तयार झालें.

सिंदुरासुराचे मांडलिक आर्य राजे व त्यांचे प्रजाजन सिंदुरासुराच्या जुलमाला अगदीं कंटाळून गेले होते. दरसाल डोईजड खंडणी भरतां भरतां त्यांच्या नाकीं नऊ आले होते. सिंदुरासुराची जुलमी सत्ता उखडून काढण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत नव्हतें. एकदिलानें व एक जुटीनें त्यांनीं सिंदुरासुरावर हल्ला करण्याचें मनांत आणलें असतें तर ते सिंदुरासुराचा सहज पराभव करूं शकले असते. पण असा एकोपा घडवून आणून क्रांतीचें रणशिंग फुंकणारा महान् नेता त्या लोकांना कोणीच लाभला नव्हता.

परकीय राक्षसांना हाकलून द्यावें, त्यांच्या जुलुमी सत्तेतून आपली सुटका करून घ्यावी, आपला देश स्वतंत्र करावा असें सर्वांना वाटत होतें; पण एवढें धाडस करायला कोणीच धजत नव्हता.

गजाननानें हें धाडस करण्याचा निश्चय केला. त्याच्या मताप्रमाणें वागणारे हजारों मित्र त्याला मिळाले. त्याच्या अनुयायांची संख्या दिवसें दिवस वाढूं लागली.

गजाननानें हिमालयाच्या पायथ्याशीं असलेल्या तराई जंगलांतून खूप हत्ती पकडून आणले. त्यांना माणसाळविलें. मग हे सर्व हत्ती शिकवून तयार केले. नंतर हत्तींचें मोठें सैन्य उभारण्यांत आलें. या सैन्याला 'गजसैन्य' म्हणजे हत्तींचें सैन्य म्हणत असत. गजाननाची सारी भिस्त या सैन्यावर होती.

सर्व तयारी होतांच गजाननानें स्वातंत्र्याचें निशाण उभारलें. पुष्कळ मांडलिक राजे त्याला येऊन मिळूं लागले. बराच प्रदेश त्यांच्या ताब्यांत आला.

ही बातमी सिंदुरासुरास कळताच त्यानें गजाननावर राक्षसांचें मोठें सैन्य पाठविलें. गजाननानें त्या सैन्यावर आपलें गजसैन्य घातलें. गजसैन्याचा हल्ला फार भयंकर व राक्षसांना नवीन होता. या सैन्यापुढें राक्षसांचा टिकाव लागेना. कित्येक राक्षस हत्तींच्या पायाखालीं चेंगरून ठार झाले. कित्येकांना हत्तींनीं आपल्या सोंडेंत धरून उचललें व उंच आकाशात फेंकून दिलें. ते खालीं पडताच त्यांच्या चिंधड्या उडाल्या.

ह्या गजसैन्यापुढें राक्षससैन्य उभें राहायला धजेना. तें जीव घेऊन पळत सुटलें. सिंदुरासुराच्या सैन्याचा सारखा पराभव होऊं लागला. त्याच्या सैनिकांना पळतां भुई थोडी झाली.

राक्षससैन्याची पिछेहाट सुरू होतांच गजाननानें त्यांचा पाठलाग करण्यास सुरुवात केली. शेवटीं सिंदुरासुराच्या राजधानीला वेढा देण्यांत आला.

सिंदुरासुरानें आपल्या नावावरून राजधानीचें नांव सिंदुर-

वाड ठेवलें होतें. राजधानीला वेढा पडतांच सिंदुरासुर आंत कोंडला गेला. त्यानें वेढा फोडून काढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले. पण सर्व व्यर्थ गेले.

नगराचे दरवाजे बंद करून तटावरून शत्रु-सैन्यावर सिंदुरासुर हल्ले करूं लागला. गजाननानें चांगले बलवान हत्ती निवडून काढले. त्यांच्या माहुतांना बोलावून आणून, नगराच्या दरवाजावर धडका मारण्याची आज्ञा केली. आज्ञेप्रमाणें हत्तीकडून दरवाजावर धडका मारण्याचें काम सुरु झालें. तटावरून राक्षस-सैन्याचे हल्ले सुरूं होते.

युद्धाचें होमकुंड पेटलें होतें. असंख्य वीरांच्या आहुती पडत होत्या. बाणांचा तर नुसता पाऊस पडत होता. रक्ताचे पाट वाहात होते. मांसाचा चिखल झाला होता. प्रत्येकजण मरूं किंवा मारूं या निश्चयानें लढत होता. गजाननाचा सेनासागर अगदीं खवळून गेला होता. स्वतः गजानन हत्तीवर बसून आपल्या शूर सैनिकाना उत्तेजन देत होता.

कांहीं वेळांत नगराचे दरवाजे मोडून पडले व गजाननाचें सैन्य नगरांत घुसलें. रस्त्या रस्त्यांतून हाणामारीला सुरवात झाली. लवकरच गजाननाची व सिंदुरासुराची गांठ पडली. दोघांचें घनघोर युद्ध सुरु झालें. बराच वेळ कोण कोणास हार जाईना. शेवटीं गजाननानें सिंदुरासुरास मोठ्या शिताफीनें ठार केलें.

आपला राजा पडलेला कळतांच सर्व राक्षस-सैन्य व राक्षस-मंत्रिमंडळ शरण आलें. लोकांना कोणत्याहि प्रकारें त्रास देणार नाहीं व चांगुलपणानें राहूं, असें कबूल केल्यावर त्या लोकांना

येथें राहण्याची गजाननानें परवानगी दिली. महाजृंभा आपल्या माहेरीं निघून गेली.

देवांचा राजा इंद्र, इतर अनेक देव आणि सिंदुरासुराचा पिता ब्रम्हदेव बंदीशाळेंत होते. त्या सर्वांची गजाननानें सुटका केली. ब्रम्हदेवाच्या स्वाधीन सर्व राज्य केलें. ब्रम्हदेवाची पत्नी सरस्वती हिला महाराणी पद दिलें. गजाननाच्या या पराक्रमामुळें त्याचा लौकीक सर्व देशभर पसरला होता. सर्व लोक त्याला धन्यवाद देऊं लागले. त्यानें राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून दिलें. पण तो स्वतः राजा कधींच झाला नाहीं.

लोकसेवेंत सर्व आयुष्य घालविण्याचें त्यानें ठरविलें. त्यानें सर्व राजे लोकांचीं राज्यें त्यांना परत दिलीं. प्रजेशीं न्यायानें व नीतीनें वागण्याबद्दल सर्वांना बजावून सांगितलें.

गजाननाचा सन्मान करावयाचें सर्व राजांनीं ठरविलें. त्याप्रमाणें समारंभाची सर्व तयारी झाली. सर्व देशाच्या राजांना, ऋषींना व विद्वान् लोकांना आमंत्रणें गेलीं. समारंभास शंकर-पार्वती ब्रम्हदेवाचे पाहुणे म्हणून आले होते. ठरविलेल्या वेळीं सत्कार–समारंभ मोठ्या थाटामाटानें झाला. गजाननास 'गणपति' ही मोठ्या मानाची पदवी दिली.

गजाननास पाहून पार्वतीला त्याच्याविषयीं प्रेम वाटूं लागलें होतें. समारंभाचा मुख्य कार्यक्रम संपतांच पराशर ऋषींनीं उठून हा मुलगा आपणास कोठें व कसा सांपडला याची सर्व हकीकत सांगितली. ते म्हणाले, ' मला त्या वेळीं वाटलं कीं हा कोणी तरी क्षत्रिय राजपुत्र असावा व सिंदुरासुराच्या भीतीनं त्याला अरण्यांत लपवून ठेवण्यासाठीं आणला असावा. माझ्या अल्पशक्ती-प्रमाणं मी याचं संगोपन केलं आहे आणि माझ्या बालबुद्धी-

प्रमाणं मी याला शिक्षण दिलं आहे. हा मला सापडला तेव्हां याच्या गळ्यांत हत्तीचं तोंड कोरलेला हा ताईत होता.' असें म्हणून पराशरांनीं तो ताईत सर्वांना दाखविला.

शंकर–पार्वतीनें तो ताईत तत्काळ ओळखला. राजा वरेण्य व राणी पुष्पावती हीं या समारंभाला आलीं होतीं. त्यांनींहि तो ताईत ओळखला. आपला मुलगा सांपडला म्हणून शंकर–पार्वतीला आनंद झाला. राजा वरेण्य व राणी पुष्पावती ह्यांना तर फारच आनंद झाला. कारण मित्राचा मुलगा गमावल्याचा त्यांना जो कलंक लागला होता त्या कलंकांतून ते मुक्त झाले होते.

आपला मुलगा सांपडला एवढेंच नाहीं तर तो मोठा विद्वान् व पराक्रमी निपजला हें पाहून शंकर–पार्वतीला धन्यता वाटली. गजानन माता-पित्यासह कैलास नगरीला गेला. तेथें त्यांचा प्रचंड सत्कार करण्यांत आला.

गजानन कांहीं दिवस आपल्या आईबापाजवळ राहिला व नंतर तो ब्रम्हदेवाकडे आला. ब्रम्हदेवाच्या सल्ल्यानें त्यानें व सरस्वतीनें लोकांत शिक्षणाचा प्रसार सुरू केला. आपल्या शेजारच्या देशांतून गजाननानें लिहिण्याची कला आपल्या देशांत आणली.'

'गुरुजी, लिहिण्याच्या कलेचा शोध प्रथम कोणत्या देशांत लागला?' मायकेलनें विचारलें.

'लिहिण्याच्या कलेचा प्रारंभ प्रथम चीनमध्यें झाला. तेथून ती कला तिबेटांत आली. मग तेथून गजाननानें ती आपल्या देशांत आणली. त्यानें या कलेंत पुष्कळ सुधारणा केली. आपण जें बोलतों, जे उच्चार करतों ते जसेच्या तसें लिहितां येईल अशी सुंदर, सोपी व शास्त्रशुद्ध लिपी बनविली. त्यानें सर्व देश-

भर या लिपीचा प्रसार केला आणि लोकांना लिहिण्याचें ज्ञान करून दिलें. एवढेंच करून तो थांबला नाहीं तर त्यानें लोकांना गोमातेचें महत्त्व पटवून दिलें व शेतीची सुधारणा केली. त्या वेळीं सर्व शेतें हराटीनें भरून गेलेलीं असत. त्यामुळें शेतांत तण माजून पीक येत नसे. गजाननानें नांगराचा उपयोग करून हराटीचा नाश करण्याचा उपाय शेतकऱ्यांना सांगितला. या उपायानें पिकांतील तण नाहींसें झालें. हराटीचा नाश झाला व पिकें चांगलीं येऊं लागलीं.

गजाननानें सैन्यांत हत्तींचा प्रथमच उपयोग केला व सैन्याचा तो एक प्रमुख भाग बनविला. मुलांना व तरुणांना व्यायामाची संवय लावली. गरीबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना मिळेल असा गुळ-खोबऱ्याचा पौष्टिक पण स्वस्त असा खुराक सुरू केला.

सरस्वतीच्या सहाय्यानें लोकांत गायनकलेचा प्रसार केला. गायनवादनानें लोकांना भरपूर करमणूक मिळूं लागली.

गजानन हा चांगला लेखक होता. त्यानें राजा वरेण्याकडून लिहून घेतलेला गणेशगीता हा ग्रंथ सुप्रसिद्धच आहे. त्याचें हस्ताक्षर फार सुंदर व वळणदार होतें म्हणून त्याचा गुरुबंधु व्यास ह्यानें त्याच्याकडून आपला महाभारत हा ग्रंथ लिहून घेतला.

गजाननानें लोकहिताच्या किती तरी गोष्टी केल्या म्हणून तो लोकांचा आवडता झाला. त्यानें देश स्वतंत्र केला. सैन्यांत सुधारणा केली. शेती सुधारली. शिक्षणाचा प्रसार केला. म्हणून तो थोर राष्ट्रपुरुष झाला. आणि लोक त्याची भक्तीनें पूजा करूं लागले.

पुढें गजानन नांवावरून त्याला त्याच्या अंध भक्तांनीं सोंड लावली. मारुती वानर जातीचा म्हणून त्याला शेंपूट व रावण

राक्षस म्हणून त्याला दहा तोंडें चिकटविण्यांत आलीं. ह्या सर्व गोष्टी खोट्या आहेत. गजाननाला सोंड नव्हती, मारुतीला शेंपूट नव्हतें व रावणाहि पण दहा तोंडांचा नव्हता.'

'गुरुजी, भाद्रपद शुद्ध चतुर्थीपासूनच गणेश–उत्सव कां साजरा करतात ?' एका मुलानें प्रश्न केला.

'मी मघाशीं सांगितलं ना कीं, भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा गणपतीचा जन्म दिवस आहे. आपण टिळकजयंती, गांधीजयंती, नेताजीसप्ताह साजरे करतों ना ? त्याचप्रमाणं हा गणपतिजयंतीचा उत्सव गणेशचतुर्थीपासून एक आठवडा साजरा करण्याची पद्धत पडली.'

'गुरुजी, प्रत्येक मंगलकार्याच्या आरंभीं गणपतीची कां पूजा करतात ?' सुरेशनें विचारलें.

'पूर्वीं त्यानं मोठ्या संकटांचा नाश केला म्हणून त्याला संकटांचा नाश करणारा देव मानतात.'

'गुरुजी, गणपतीच्या आरतींतदेखील त्याला 'सुखकर्ता व दु:खहर्ता' म्हटलं आहे.' दिनकर म्हणाला.

'आपण विद्या शिकायला प्रारंभ करण्यापूर्वीं गणपतीचीच पूजा कां करतों, सांगा पाहूं ?'

'गुरुजी, मी सांगतों. गणपतीनं विद्येचा प्रसार केला म्हणून त्याला विद्यादाता म्हणतात. त्याला विद्येची देवता मानतात. आम्हीं पाडव्याला पाटीपूजनाच्या दिवशीं गणपती व सरस्वती यांची पूजा करीत होतों.' एक मुलगा म्हणाला.

'सरस्वतीची पूजा करण्याचं काय कारण ?'

'गुरुजी, सरस्वतीनंहि विद्येचा प्रसार केला आहे. तिलाहि

विद्येची देवता मानतात. म्हणून तिचीहि पूजा केली जाते.' सुरेशनें सांगितलें.

'आपण शिकायला सुरुवात करतांना पहिला धडा कोणता गिरवतों ?'

'श्रीगणेशाय नमः' दिनकरनें सांगितलें.

'सुरेश, याचा अर्थ काय, सांग पाहूं ?' गुरुजींनीं विचारलें.

'आम्ही श्रीगणेशाला नमस्कार करतों. बरोबर आहे ना, गुरुजी ?'

'बरोबर आहे.'

'गुरुजी, गणपतीला दूर्वा कां वाहतात ?' सुरेशनें विचारलें.

'गणपतीनं पिकाची नासाडी करणाऱ्या हराटीचा म्हणजे दूर्वांचा नाश कसा करावा हें सर्वांना शिकविलं म्हणून लोक त्या स्मरणार्थ त्याला दूर्वा वाहतात.'

'गुरुजी, गणपतीला मोदकच फार कां आवडतात हो ?'

'मोदकासारखा रुचकर व पौष्टिक पदार्थ कुणाला आवडणार नाहीं ? गुळखोबऱ्याचे, कणकीचे किंवा तांदळाच्या पीठाचे मोदक फार रुचकर लागतात. आपण मुद्दाम कोणतंहि पक्वान्न करून खात नाहीं. सणावाराचे दिवशीं करतों म्हणून आमच्या पूर्वजांनीं कालपरत्वें एकेक पक्वान्न एकेका सणाला करण्याची पद्धत सुरू केली.'

'गुरुजी, गणपतीचा उत्सव सर्व हिंदुस्थानभर साजरा होतो काय ?'

'होय, कमी अधिक प्रमाणांत हा उत्सव सर्व देशभर साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रांत पेशव्यांच्या काळांत हा उत्सव फार मोठ्या प्रमाणांत साजरा केला जात असे. पुढं पेशवाई

११५२२

बुडाली. इंग्रजाचं राज्य आलं आणि ह्या उत्सवाला उतरती कळा लागली. पण पुढं लोकमान्य टिळकांनीं पुढाकार घेऊन लोक-जागृतीसाठीं हा उत्सव मोठ्या जोमानं साजरा करण्याची चळवळ केली. या उत्सवाच्या निमित्तानं व्याख्यानं, पोवाडे, मेळे, कीर्तनं, नाटकं वगैरे कार्यक्रम मोठ्या धूमधडाक्यानं सुरू झाले आणि लोक-जागृतीस प्रारंभ झाला. मग काय, सिराज, मायकेल, तुम्हाला आहे का हा उत्सव पसंत ?' गुरुजींनीं विचारलें.

'गुरुजी, आमच्या सर्व शंका नाहींशा झाल्या आहेत. गणपती सारख्या राष्ट्रपुरुषाचा उत्सव करायला मी अगदीं आनंदानं तयार आहें.' सिराजनें सांगितलें.

'गुरुजी, आम्हाला खरी माहिती नव्हती म्हणून आम्ही गणपतीला नांवं ठेवलीं. आम्हाला क्षमा करा. मी या उत्सवांत अवश्य भाग घेईन.' मायकेलनें सांगितलें.

'सिराज, मायकेल, ह्या चुका तुम्हीच करतां असं नाहीं तर चांगले सुज्ञ लोकदेखील करतात. कोणीच खरी माहिती मिळवीत नाहीं व करूनहि घेत नाहीं. प्रत्येकजण दुसऱ्याच्या धर्माला व देवांना नांवं ठेवतात. त्यामुळं गैरसमजुती वाढतात आणि जाती-जातींत भांडणं होतात.'

'गुरुजी, तुम्ही ही माहिती आमच्या दलांत येऊन सांगाल काय ?' दोराबनें विचारलें.

'हो, हो, अगदीं आनंदानं सांगेन.'

'गुरुजी, उत्सवाचा कार्यक्रम केव्हां ठरवायचा ?' सिराजनें विचारलें.

'आज सायंकाळीं आपण सर्व विद्यार्थ्यांची सभा घेऊं आणि तेथेंच उत्सवाचा सर्व कार्यक्रम सर्वांच्या संमतीनं ठरवूं.' गुरु-

मोठ्या पुढाऱ्यांचीं व थोर लेखकांचीं व्याख्यानें ऐकण्याचा लाभ मिळाला म्हणून विद्यार्थ्यांचे पालक व नागरिक खूष झाले.

रात्रौ पोवाडे, नकला, मेळे, व कीर्तन असे करमणुकीचे विविध कार्यक्रम सुरू होते. एक दिवस शाळेंतील विद्यार्थ्यांनीं बसविलेलें नाटक झालें. सर्व विद्यार्थ्यांना गणपतीचा प्रसाद म्हणून फराळ देण्याचा कार्यक्रम एक दिवस करण्यांत आला. त्या दिवशीं दिनकर व सुरेश यांनीं दोराबच्या मदतीनें फराळाचा बेत फारच उत्तम ठेवला होता,

प्रत्येक विद्यार्थ्याला दोन केळीं, चार तळलेले साखर खोबऱ्याचें मोदक, चिवडा व पेलाभर दूध देण्यांत आलें.

चित्रकला व हस्तव्यवसायाचें मोठें प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. त्यात पुष्कळ मुलांमुलींनीं आपल्या कलाकृती मांडल्या होत्या.

पानसुपारीचा कार्यक्रम फारच मोठ्या प्रमाणांत करण्यांत आला. मुलांनीं सुंदर आरास मांडली होती. पानसुपारीला गावांतील सर्व धर्मांचे व सर्व जातीचे लोक आले होते. त्यांत श्रीमंत होते, गरीब होते, प्रतिष्ठित नागरिक होते, देशभक्त होते, सरकारी अधिकारीहि होते. सर्वजण विद्यार्थ्यांचें कौतुक करीत होते.

सर्व विद्यार्थ्यांना करमणुकीबरोबर ज्ञान व राष्ट्रीय शिक्षण यांचा लाभ झाला. भावी नागरिकाला योग्य असें पुष्कळ व्यावहारिक शिक्षण त्यांना या उत्सवाच्या प्रसंगानें मिळालें. जबाबदारीनें कार्य करण्याचें शिक्षण मिळालें. उत्सवाच्या निमित्तानें विद्यार्थ्यांच्या अंगांतील सुप्त गुणांचा विकास झाला.

मुलांमुलींना खेळांतील नैपुण्य, चित्रकला, हस्तव्यवसाय, अभिनय वगैरेबद्दल भरपूर बाक्षिसें वाटण्यांत आलीं.

सिराजला उत्तम सीन तयार केल्याबद्दल चांदीचा मिळाला. मायकेलला नाटकांत उत्कृष्ट काम केल्याबद्दल च लहानशी ढाल देण्यांत आली. दोराब, दिनकर व सुरेश अनुक्रमें नकला, गायन व पोवाडे यांचे सुंदर कार्यक्रम बद्दल चांदीचे लहान लहान पेले देण्यांत आले.

तो सर्व आठवडा मोठ्या आनंदांत व धामधुमींत गेला. सुरु झाला केव्हां व संपला केव्हां, हें मुलाना कळलेंसुद्धां इतकीं तीं त्यात रंगून गेलीं होतीं.

' मंगलमूर्ति मोरया '


२२५५१ ... साहि.वा. ...

IRBK-0111951